**Publication:** Navshakti
**Date:** 02/10/2013
**Edition:** Mumbai
**Page No:** 10
**Headline:** TCS IT WIz on October 20

## ‘टीसीएस आयटी विझ’ २० ऑक्टोबरला प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**मुंबई :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)ने ‘टीसीएस आयटी विझ २०१३’ चे मुंबई पर्व रविवार, २० ऑक्टोबर रोजी रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित केली आहे. ही स्पर्धा आठवी ते बारावीत शिकणाऱ्या सर्व शाळा-कॉलेज विद्यार्थ्यांसाठी (कनिष्ठ महाविद्यालयांच्या पूर्व-विद्यापीठीय विद्यार्थ्यांकरिता देखील) आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य आहे. प्रत्येक शाळा दोन-दोन स्पर्धकांचे एकाहून जास्त गट पाठवू शकते. ही स्पर्धा अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, कोईम्बतूर, दिल्ली, हैद्राबाद, इंदोर, कोची, कोलकाता, लखनऊ, मुंबई, नागपूर व पुणे अशा १४ ठिकाणी घेण्यात येणार आहे. प्रवेशिका संबंधित शाळांकडूनच १७ ऑक्टोबरपूर्वी टीसीएस आयटी विझ कोऑर्डीनेटर, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस हाऊस) रेव्हलाईन स्ट्रीट, २१, डीएस मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ या पत्त्यावर पाठवाव्यात. अधिक माहितीसाठी ९१ २२ ६७७८९०८०/८१ वर संपर्क साधा. शाळा : www.tcsitwiz.com वर ऑनलाईन नोंदणी करु शकतात.